मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पूरस्थिती टाळण्यासाठी नालेसफाई युद्धपातळीवर

## पिंपरीत 143 नाल्यांची सफाई सुरू; 50 टक्के काम पूर्ण, गुणवत्तेवर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकाकडून पावसाळ्यापूर्वी पूरस्थिती टाळण्यासाठी शहरातील १४३ नाल्यांच्या सफाईला वेग देण्यात आला आहे. आत्तापर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले असून एप्रिलअखेरपर्यंत सर्व नाले स्वच्छ करण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे.

शहरात एकूण १४५ नैसर्गिक नाले असून ते पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांना मिळतात. या नाल्यांमध्ये कचरा, प्लास्टिक, राडारोडा टाकल्याने गाळ साचून नाले उथळ होत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचून घरांमध्ये घुसण्याचा धोका वाढतो.



गेल्या वर्षी चिखली, सांगवी, दापोडी, चिंचवड आदी भागांत पूरस्थिती निर्माण होऊन शेकडो नागरिकांचे स्थलांतर करावे लागले होते. यंदा अशी परिस्थिती टाळण्यासाठी महापालिकेने मार्चपासून नालेसफाई सुरू केली आहे. मनुष्यबळासह यांत्रिक साधनांचा वापर करून कामे केली जात आहेत.

जेसीबी, पोकलेन यांसारख्या यांत्रिक साधनांचा वापर करून नाल्यांमधील गाळ आणि कचरा काढण्यात येत आहे. कामाची प्रगती नियमितपणे नोंदवण्यासाठी डिजिटल पद्धतीचा वापर करण्यात येत असून, प्रत्येक विभागाकडून गुगल स्प्रेडशिटच्या माध्यमातून माहिती अद्ययावत केली जात आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करून नालेसफाई वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

### एप्रिलअखेर सर्व नाले साफ होणार

**» नालेसफाईचे काम सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या पथकांकडून करण्यात येत आहे. जेसीबी, पोकलेन व स्पायडर मशिनद्वारे साफसफाई केली जात आहे. अरुंद नाल्यात मशिन जात नाहीत, अशा नाल्यांमध्ये सुरक्षेची सर्व साधने वापरून मनुष्यबळाद्वारे सफाई करण्यात येत आहे. नालेसफाईपूर्वीचे व नंतरचे छायाचित्रे घेतली जाणार आहेत. प्रत्येक आठवड्याला नालेसफाईचा आढावा घेण्यात येत आहे. हे काम एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, असे आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.**

# चिखलीतील दूषित पाणीप्रश्न गंभीर; नागरिक त्रस्त – प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढला

## इंद्रायणी पाणीपुरवठ्यावर प्रश्नचिन्ह; दूषित पाण्यामुळे नागरिक संतप्त, आंदोलनाचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली परिसरात इंद्रायणी नदीवरील पाणी उपसा केंद्र आणि जलशुद्धीकरण केंद्रातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मोशी प्राधिकरणासह सेक्टर ४, ६, ९, ११, संतनगर, मोशीगाव, डुडुळगाव आणि चऱ्होली परिसरात दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या तक्रारींनुसार पुरवठा होणाऱ्या पाण्यात गढूळपणा, दुर्गंधी, पिवळसर-हिरवट रंग तसेच काही ठिकाणी अळ्या व जंतू आढळून येत आहेत. यामुळे पोटदुखी, जुलाब, उलट्या आणि मळमळ





यांसारख्या आरोग्याच्या तक्रारी वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना याचा मोठा फटका बसत आहे.

सामाजिक कार्यकर्ते श्री. रविंद्र आळणे (अथर्व वॉटर टेक सोल्युशन्स) यांनी विविध भागांतून पाण्याचे नमुने गोळा करून मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये तपासणी केली असता, त्यात बॅक्टेरिया आणि आरोग्यास घातक घटक आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. या अहवालांमुळे पाण्याच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या समस्येवर श्री. रविंद्र आळणे, श्री. दीपक नाईक, श्री. नितीन यादव आणि श्री. किशोर थोरात यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. विविध सोसायट्यांनी अधिकृत तक्रारी, पत्रव्यवहार आणि ई-मेलद्वारेही समस्या मांडली आहे.

दि. ४ एप्रिल रोजी नागरिकांनी एकत्र येत महापौरांकडे निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र समस्या अद्याप कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. ही समस्या नवीन नसून २०२५ मध्येही याच स्वरूपाची परिस्थिती निर्माण झाली होती. पावसाळ्यात परिस्थिती सुधारते, मात्र पावसाळ्यानंतर पुन्हा दूषित पाणीपुरवठ्याची समस्या उद्भवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, परिसरातील नागरिकांची प्रमुख मागणी म्हणजे पूर्वीप्रमाणे पवना नदीतून स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच चिखली-निघोजे प्रकल्पाच्या कार्यक्षमतेची सखोल चौकशी करण्यात यावी.

### ... अन्यथा आंदोलन छेडणार!

**» या प्रकरणात विविध सामाजिक संघटनांनीही सहभाग घेत प्रशासनावर दबाव वाढवला आहे. ६ एप्रिल रोजी नियोजित आयुक्तांसोबतची बैठक रद्द झाल्यानंतर १० एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी ठोस कारवाईची मागणी केली. तसेच ११ एप्रिल रोजी जलशुद्धीकरण केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. नागरिकांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, तातडीने शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठा सुरू न झाल्यास मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले जाईल. मूलभूत गरज असलेल्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.**

# भारतीय उद्योजिकतेचा जागतिक डंका!

## अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया अशी ख्याती असलेल्या भरत गीते यांची यशोगाथा आता हार्वर्डच्या अभ्यासक्रमात...



**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय उद्योजकांसाठी आणि विशेषतः मराठी जनसामान्यांसाठी आजचा दिवस अभिमानाचा ठरला आहे. पुण्यातील चाकण आणि सुपा परिसरात आपला उद्योग विस्तारणाऱ्या 'तौरल इंडिया' या कंपनीची यशोगाथा आता जगातील सर्वात प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या 'हार्वर्ड बिझनेस स्कूल'मध्ये केस स्टडी म्हणून शिकवली जाणार आहे. मुंबईत नुकत्याच आयोजित एका विशेष सोहळ्यात या केस स्टडीचे अधिकृत अनावरण करण्यात आले. या माध्यमातून मराठी उद्योजक भरत गीते यांनी शून्यातून विश्व निर्माण करत.जागतिक दर्जाची कंपनी कशी उभी केली, याची यशोगाथा आता जगातील भावी उद्योजक गिरवणार आहेत.

अॅल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या तौरल इंडियाचा प्रवास २०१६ मध्ये जर्मनीच्या 'थोनी अल्युटेक' या कंपनीसह झालेल्या संयुक्त उपक्रमातून सुरू झाला. कोणताही मोठा औद्योगिक वारसा किंवा गॉडफादर पाठीशी नसताना केवळ जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर भरत गीते यांनी ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस यांसारख्या अत्यंत कठीण क्षेत्रांमध्ये आपले पाय घट्ट रोवले. हार्वर्डचे प्राध्यापक व्ही. जी. नारायणन यांनी ही केस स्टडी तयार केली असून, यात प्रामुख्याने जागतिक सहकार्य आणि स्थानिक अंमलबजावणी यांचा मेळ घालून एखादा उद्योग जागतिक स्तरावर कसा स्पर्धात्मक बनू शकतो, याचे सविस्तर विश्लेषण केले गेले आहे.

भरत गीते जाणीवपूर्वक उद्योगाच्या विकेंद्रीकरणावर भर दिला आहे. म्हणूनच चाकणसारख्या विकसित क्षेत्रासोबतच त्यांनी अहमदनगरमधील सुपा या ग्रामीण भागाची निवड करून तिथे चारपट मोठ्या क्षमतेचा प्रकल्प उभारला आहे. जागतिक पुरवठा साखळीमध्ये 'चायना प्लस वन' ही संकल्पना जोर धरत असताना भारत प्रगत उत्पादनाचे केंद्र कसे बनू शकतो, याचे तौरल इंडिया हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

या कार्यक्रमादरम्यान तरुण अभियंता आणि भावी उद्योजकांना मार्गदर्शन करताना गीते यांनी 'सकारात्मक दृष्टिकोन' हाच यशाचा मंत्र असल्याचे सांगितले. उद्योजकीय प्रवासात अनेक नकारात्मक गोष्टी, आर्थिक अडचणी आणि प्रशासकीय अडथळे येतात, पण उद्योजक तोच जो अभिमन्यूसारखा हा चक्रव्यूह भेदून पुढे जातो. "मी अर्धा भरलेला ग्लास पाहणारा माणूस आहे, रिकामा नाही," असे सांगत त्यांनी तरुणांना नाविन्यपूर्ण आणि वैज्ञानिक उत्पादनांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे, ही जागतिक स्तरावरील केस स्टडी सध्या इंग्रजी भाषेत असली तरी, ग्रामीण भागातील मुलांपर्यंत ती पोहोचावी यासाठी ती मराठीत उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे, जेणेकरून महाराष्ट्राच्या मातीतून हजारो नवीन 'भरत गीते' घडावेत. या ऐतिहासिक क्षणामुळे केवळ महाराष्ट्राचीच नव्हे तर संपूर्ण देशाची मान उंचावली असून, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या मोहिमेला यामुळे एक नवी दिशा आणि जागतिक मान्यता मिळाली आहे.





> **हार्वर्डमध्ये केस स्टडी म्हणून निवड होणे हा केवळ माझा किंवा माझ्या कंपनीचा सन्मान नसून तो प्रत्येक त्या भारतीयाचा सन्मान आहे जो देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहतो आहे.**
>
> **- भरत गीते**



# पाणीपुरवठा करणाऱ्या टँकर चालकांबाबत महापालिकेचा मोठा निर्णय !

## टँकरचालकांच 'ब्रेथ अॅनालायझर' चाचणी करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात पाण्याच्या टँकरची वाहतूक सुरक्षित व्हावी, यासाठी टँकरचालकांच 'ब्रेथ अॅनालायझर' चाचणी करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. उन्हाळ्यात टँकरची मागणी वाढली असून, वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

पाणीपुरवठा विभागप्रमुख नंदकिशोर जगताप म्हणाले, 'उन्हाळ्यात नागरिकांकडून पिण्याच्या पाण्याच्या टँकरची मागणी वाढते. अपघात टळावेत आणि वाहतूक सुरक्षित व्हावी, यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून टँकरचालकांची 'ब्रेथ अॅनालायझर' चाचणी होणार आहे. टँकरचालक मद्य पिऊन तर कामावर आला नाही ना, हे तपासणे या चाचणीमुळे समजणार आहे.'

महापालिकेकडून सद्यःस्थितीत शहरातील विविध भागांत सुमारे १५०० टँकरद्वारे शहरात पाणीपुरवठा केला जात आहे. याशिवाय, ९० खासगी टँकरही नागरिकांची पाण्याची गरज भागविण्याच्या व्यवस्थेत सहभागी आहेत. शहरभरात आठ फीडर पॉइंटवरून दररोज अंदाजे १६०० टँकरमार्फत नागरिकांना पाणी दिले जाते.




### अपघात रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

» भरधाव वेग, बेफिकीर वाहनचालक आणि मद्यपानामुळे वाढलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. पोलिसांच्या वाहतूक शाखेसोबत समन्वय साधून ही मोहीम राबवली जाणार आहे. टँकरचालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याच्या कडक सूचना देण्यात येणार असून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येत आहे.

भरधाव वेग, बेफिकीर वाहनचालक आणि काही वेळा मद्यपान करून वाहने चालविण्याच्या घटनांमुळे अपघात घडत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महापालिकेने पोलिसांच्या वाहतूक शाखेबरोबर चर्चा करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला.

शहरातील कोणत्याही भागात पाण्याच्या टँकरमुळे अपघात होऊ नये, यासाठी सर्व टँकर फीडर पॉइंटवर (टँकर भरण्याच्या ठिकाणी ) चालकांची 'ब्रेथ अॅनालायझर'द्वारे तपासणी केली जाणार आहे. जे टँकरचालक मद्यपान केलेले आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असून, संबंधित टँकरसेवाही तत्काळ बंद करण्यात येईल, असे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख जगताप यांनी सांगितले. याशिवाय, टँकरचालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबतही कडक सूचना दिल्या जाणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

अधिक माहिती देताना जगताप म्हणाले, शहरात टँकरचालकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. अपघातही वाढले आहेत. यामुळे पोलिसांच्या वाहतूक शाखेबरोबर चर्चा करून 'ब्रेथ अॅनालायझर' यंत्रे घेतली जाणार आहेत. फीडर पॉइंटवर टँकर भरण्यापूर्वी चालकाची ब्रेथ अॅनालायझर चाचणी केली जाणार आहे. त्यानंतरच त्याला टँकर चालविण्याची परवानगी दिली जाणार आहे.

शहरातील ज्या परिसरात महापालिकेला पाणीपुरवठा करणे अडचणीचे होते अशा भागातील नागरिकांना महापालिका टँकरने पाणीपुरवठा करते. यामध्ये महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या समावेश आहे. काही तांत्रिक कारणांमुळे महापालिकेला पाणीपुरवठा करण्यास अडचण आल्यास त्या भागातील नागरिकांना टँकरच्या माध्यमातून पाणी देऊन नागरिकांची गरज भागविली जाते. यासाठी कोणतेही शुल्क घेतले जात नाही. हे टँकर मोफत दिले जातात.

### टँकरचालकांची ब्रेथ अॅनालायझर चाचणी

» पुणे महानगरपालिकाने पाण्याच्या टँकरमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी चालकांची 'ब्रेथ अॅनालायझर' चाचणी करण्याचा निर्णय घेतला आहे. पाणीपुरवठा विभागप्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले की, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या चालकांवर लक्ष ठेवण्यासाठी ही उपाययोजना करण्यात येत आहे. चाचणीमध्ये दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाणार आहे.

### फीडर पॉइंटवर सक्तीची तपासणी

» शहरातील सर्व टँकर फीडर पॉइंटवर टँकर भरण्यापूर्वी चालकांची तपासणी केली जाणार आहे. दररोज सुमारे १६०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून त्यात १५०० महापालिकेचे आणि ९० खासगी टँकरांचा समावेश आहे. तपासणीनंतरच चालकांना टँकर चालवण्याची परवानगी दिली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल.

# पुण्यात अरुंद रस्त्यांना नावाऐवजी क्रमांक; महापालिकेचे नवे धोरण

## नाव देण्यासाठी कडक नियम; प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरच नामकरण, सदस्यांची एकमत आवश्यक

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील नऊ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या गल्लीबोळातील रस्त्यांना आता नावे न देताना त्यांना क्रमांक देण्यात येणार आहेत. तसेच, प्रभागातील रस्ते, चौक, उड्डाणपूल, तसेच महापालिकेच्या मिळकतींना नावे देताना संबंधित प्रभागातील एक सदस्य सूचक, तर उर्वरित सर्व सदस्यांचे अनुमोदन असणे आवश्यक असणार आहे. यासंबंधीचे नाव समिती धोरण महापालिका प्रशासनाने तयार केले असून, ते पक्षनेत्यांसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहे.




शहरातील रस्ते, चौक, उड्डाणपूल, तसेच महापालिकेच्या मिळकतींना नावे देण्यासाठी महापालिकेकडून नाव समिती नेमण्यात येते. या समितीकडे मागील दोन महिन्यांत 70हून अधिक प्रस्ताव दाखल झाले आहेत. या प्रस्तावांवर निर्णय घेण्यासाठी नाव समितीच्या धोरणात बदल सुचविण्यात आले आहेत. या सुधारित धोरणानुसार आता रस्ते, चौक, उड्डाणपूल अशी मोठ्या प्रकल्पांची कामे पूर्ण होण्याआधीच त्याला नाव देण्यासाठी नगरसेवकांमध्ये स्पर्धा सुरू होते, त्यामधून अनेकदा वादविवाद होतात.

तो रोखण्यासाठी संबंधित ज्या प्रकल्पाला नाव द्यायचे आहे, त्याचे काम 100 टक्के पूर्ण झाल्यानंतरच नाव देण्याचा प्रस्ताव स्वीकारला जाणार असल्याचा महत्त्वपूर्ण बदल केला आहे. ज्या प्रभागात हा प्रकल्प आहे, त्या प्रभागातील एक सदस्य सूचक, तर उर्वरित सर्व सदस्यांचे अनुमोदन असणे आवश्यक असणार आहे. याशिवाय नऊ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांना नाव न देता संबंधित रस्त्यांना गल्ली क्रमांक दिले जाणार आहेत. पक्षनेत्यांच्या येत्या 15 एप्रिल रोजी होणाऱ्या बैठकीत या धोरणावर निर्णय होणार आहे.

### प्रस्तावित बदल

» प्रस्ताव दिल्यानंतर एक ते दोन महिने अभिप्रायासाठी लागणार
» दोन प्रभागांच्या हद्दीवरील प्रकल्पांसाठी दोन्ही प्रभागांच्या सदस्यांची अनुमती हवी
» पूर्वी नाव दिलेले असल्यास नवीन नाव दिले जाणार नाही
» सलग रस्त्यावर एका चौकापासून दुसऱ्या चौकापर्यंत एकच नाव नावाबाबत वाद झाल्यास नाव समितीला निर्णय घेण्याचे अधिकार

# पुण्यात वाहतूक कोंडीवर तोडगा; 32 प्रमुख रस्त्यांवरील अडथळे दूर

## महापालिका-पोलिसांचे 64 अधिकारी समन्वयक; मिसिंग लिंक रस्त्यांच्या कामांना गती

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पालिका वर्दळीच्या ३२ प्रमुख रस्त्यांवरील अडथळे दूर करणार आहेत. त्यासाठी रस्त्यांवरील पायाभूत सुविधा आणि कोंडीला कारणीभूत ठरणाऱ्या अडचणी दूर केल्या जाणार आहेत. या रस्त्यांसाठी पालिकेचे ३२ आणि पोलिस विभागाचे ३२ असे एकूण ६४ अधिकारी समन्वयक म्हणून नियुक्त केले आहेत. या अधिकाऱ्यांनी संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून कामांच्या प्रगतीवर देखरेख ठेवायची आहे. सोमवारी झालेल्या शहर परिवर्तन समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

शहरातील वाढती आव्हाने लक्षात घेऊन विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये समन्वय वाढविण्यासाठी शहर परिवर्तन समिती स्थापन केली आहे. या समितीची दुसरी बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. बैठकीस महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, प्रजित नायर, ओमप्रकाश दिवटे,

शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांच्यासह महाराष्ट्र राज्य वीजवितरण कंपनी, भूमी अभिलेख, दूरसंचार सेवा प्रदाते, महामेट्रो, पीएमपीएमएल, पीएमआरडीए, वन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय तसेच पालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील १२ मिसिंग लिंक रस्त्यांच्या विकासासाठी भूसंपादन, मोजणी आणि अतिक्रमण हटविण्यातील अडचणींवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. बाणेर–पाषाण लिंक रोड, वाकड–कस्पटे वस्ती रस्ता, आंबेडकर चौक ते राजाराम पूल रस्ता आणि वारजे येथील रोजरी स्कूल ते तिरुपती नगर या मार्गावरील कामांना गती देण्यासाठी संबंधित विभागांना वेळेत कार्यवाहीचे आदेश दिले. भूसंपादनातील अडथळे तातडीने दूर करून प्रस्ताव जिल्हाधिकारी मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचनाही दिल्या.



### ६४ अधिकाऱ्यांची समन्वयासाठी नियुक्ती

» या उपक्रमासाठी पालिकेचे ३२ आणि पोलिस विभागाचे ३२ असे एकूण ६४ अधिकारी समन्वयक म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. नवल किशोर राम आणि जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मिसिंग लिंक रस्त्यांच्या विकासासाठी भूसंपादन आणि अतिक्रमण हटवण्याच्या कामांना गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### ३२ रस्त्यांवरील अडथळे दूर होणार

» पुणे महानगरपालिका शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ३२ प्रमुख रस्त्यांवरील अडथळे दूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या रस्त्यांवरील पायाभूत सुविधांतील त्रुटी, अतिक्रमण आणि इतर अडचणी दूर केल्या जाणार आहेत. शहर परिवर्तन समितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. कोंडी कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे.

### वॉटर लॉगिंगवर उपाययोजना

» वाहतूक पोलिसांचे पीटीपी ॲप पालिकेच्या ॲपशी जोडणार
» रस्ता खोदाईसाठी पोलीस तातडीने एनओसी देणार
» वन विभागाच्या जागांवरील प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करणार
» प्रमुख रस्त्यांवर रिक्षा थांबे निश्चित होणार, बेवारस वाहने हटविणार
» पाच महत्त्वाच्या रस्त्यांवर पे अँड पार्क योजना राबविणार

# शिरूर तालुक्यात पाणीटंचाई तीव्र; चासकमान आवर्तन सोडण्याची मागणी

## टेल भागातील पाझर तलाव कोरडे; पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर, तातडीने कालवा सुरू करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील चासकमानच्या लाभक्षेत्रातील टेल भागामध्ये पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गडद होत चालले आहे, बहुतांश पाझर तलाव कोरडे पडले असून, या परिसरातील सर्वांत मोठा मोटेवाडी पाझर तलावात फक्त आठ दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक असल्याने तातडीने चासकमानचे आवर्तन सोडा, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्या वृषाली वाळके यांनी केली आहे.

सध्या उन्हाची तीवता वाढत चालली असून, विहिरी, कूपनलिका, ओढे-नाले कोरडे पडले आहेत. चासकमानच्या टेल भागाला टंचाईच्या काळात प्रकल्पाचे पाणी हाच एकमेव आशेचा किरण आहे. बहुतांश पाझर तलाव आटल्यामुळे शेतातील पिके कोमेजून चालली आहेत. मोटेवाडी पाझर तलावामुळे लंघेवाडी, चव्हाणवाडी, दुर्गेवस्ती आदी परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित आहेत. वेळीच आवर्तन सुटले नाही तर या परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्या जटिल होऊ शकते.

निमोणे, गुणाट, न्हावरे, निर्वी, आंधळगाव आदी परिसरात देखील पाण्यासाठी शेतकरी आग्रही असून, लवकरात लवकर कालवा सल्लागार समितीची बैठक घेऊन तातडीने टेल टू हेड या स्वरूपात आवर्तन सोडण्यात यावे. आवर्तनाला उशीर झाला तर पाण्यासाठी अनेक ठिकाणी कालवा फोडाफोडीचा प्रकार यापूर्वी घडला आहे. त्यामुळे विलंब न करता प्रशासनाने तातडीने आवर्तनाचे नियोजन करावे, अशी मागणी वृषाली वाळके यांनी केली आहे.



### टेल भागात पाणीटंचाई तीव्र

» चासकमान प्रकल्पच्या टेल भागात पाणीटंचाईचे संकट गंभीर बनले आहे. पाझर तलाव कोरडे पडले असून मोटेवाडी तलावात फक्त आठ दिवसांचा पाणीसाठा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्या वृषाली वाळके यांनी तातडीने आवर्तन सोडण्याची मागणी केली आहे. विहिरी, कूपनलिका आणि ओढे आटल्याने नागरिक व शेतकरी अडचणीत आले आहेत.

### तातडीने आवर्तन सोडण्याची मागणी

» निमोणे, गुणाट, न्हावरे, निर्वी, आंधळगाव परिसरातील शेतकऱ्यांनीही आवर्तन सोडण्याची मागणी केली आहे. कालवा सल्लागार समितीची तातडीने बैठक घेऊन टेल टू हेड पद्धतीने पाणी सोडावे, असे आवाहन करण्यात आले. उशीर झाल्यास कालवा फोडाफोडीच्या घटना घडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून प्रशासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.